# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:17.04.2026** **वार: शुक्रवार**

---

1. महिला आरक्षण विधेयकावर चर्चेसाठी संसदेच्या विशेष अधिवेशनाला सुरुवात; धोरण निर्मितीमध्ये महिलांना योग्य प्रतिनिधित्व देणं ही काळाची गरज असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन
2. महिला आरक्षण विधेयकाला मतदारसंघ पुनर्रचनेशी जोडायला विरोधी पक्षांचा विरोध
3. राज्यसभेच्या उपाध्यक्षपदासाठी आज निवडणूक
4. फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉ यांची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा आणि
5. इस्रायल आणि लेबेनॉन यांच्यात 10 दिवसांची तात्पुरती युद्धबंदी लागू

**संसद**

संसदेच्या विस्तारित अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या तीन दिवसीय विशेष सत्राला कालपासून सुरुवात झाल्यानंतर पहिल्या दिवशीचं लोकसभेचं कामकाज काल रात्री उशीरापर्यंत सुरू होतं. कालच्या या सत्रात 131 वं घटना दुरुस्ती विधेयक 2026, मतदारसंघ फेररचना विधेयक 2026 आणि केंद्र शासित प्रदेश अधिनियम कायदा (दुरुस्ती) विधेयक 2026 वर चर्चा झाली. लोकसभा तसंच राज्यं आणि केंद्र शासित प्रदेशांच्या विधानसभांमध्ये महिला सदस्यांची संख्या वाढवणं हा या तीन विधेयकांचा उद्देश आहे. मतदारसंघांच्या फेररचनेचं काम सुलभ व्हावं तसंच लोकसभा आणि विधानसभांमध्ये महिलांसाठी एक तृतीयांश जागा राखीव ठेवण्याच्या तरतुदीची अंमलबजावणी करण्यासाठी ही तीन विधेयकं मांडण्यात आली आहेत.

विधी खात्याचे मंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी काल 131 वं घटना दुरुस्ती विधेयक लोकसभेत सादर केलं. लोकसभेतील जागांची संख्या 543 वरून 850 पर्यंत वाढवणं हा या विधेयकाचा उद्देश्य आहे. या 850 मधील 815 सदस्य राज्यांमधून तर 35 सदस्य केंद्र शासित प्रदेशांमधून निवडण्यात येतील.

या विधेयकांवरल्या चर्चेला, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरूवात केली. नारी शक्ती वंदन विधेयकावरल्या चर्चेत बोलताना, लोकसंख्येचा निम्मा भाग असलेल्या महिलांना निर्णय प्रक्रियेत सामावून घेणं आवश्यक असून महिला, देशाच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. याला राजकीय रंग देऊ नये, असं आवाहन करत हे विधेयक लोकशाहीच्या हिताचं असल्याचं पंतप्रधान म्हणाले. संसदीय लोकशाहीत महिलांचा सहभाग हा केवळ संख्येपुरता नसून ती लोकशाही मूल्यांप्रती असलेली बांधिलकी आहे, असंही पंतप्रधानांनी नमूद केलं. मतदारसंघ पुनर्रचना विधेयकामुळे कुठल्याही राज्याच्या बाबतीत भेदभाव होणार नाही, असंही त्यांनी स्पष्ट केलं. ते म्हणाले....

**आज बड़ी जिम्मेवारी के साथ इस सदन में कहना चाहता हूं कि चाहे दक्षिण हो, उत्तर हो, पूर्व हो, पश्चिम हो, छोटे राज्य हो, बड़े राज्य हो निर्णय प्रक्रिया किसी के साथ भी भेदभाव नहीं करेगी। यह निर्णय प्रक्रिया किसी के साथ अन्याय नहीं करेगी। भूतकाल में जो सरकारें रही और जिनके कालखंड में जो परिसीमन हुआ और जो अनुपात उस समय से चला आ रहा है, उस अनुपात में भी कोई बदलाव नहीं होगा।**

या विधेयकावरील चर्चेत केंद्रीय गृह मंत्री अमित शाह यांनी केलेल्या छोटेखानी भाषणात मतदारसंघ फेररचनेनंतर दक्षिणेतील राज्यांमधल्या लोकसभेच्या जागा कमी होणार नसल्याचं स्पष्ट करत याविषयी व्यक्त करण्यात येत असलेली भीती

फेटाळून लावली. प्रस्तावित चौकटीत कुठल्याही भागातल्या जागांची एकंदर संख्या कमी होणार नाही उलट दक्षिणेतील लोकप्रतिनिधींची संख्या वाढेल, असं शहा यांनी सांगितलं.

कॉंग्रेस नेत्या प्रियंका गांधी, गौरव गोगोई, समाजवादी पक्षाचे नेते अखिलेश यादव, यांनीही या विधेयकांवरील चर्चेत भाग घेतला. पंचायत राज संस्था आणि नगरपालिकांमध्ये महिलांसाठी आरक्षणाची तरतूद सर्वप्रथम माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या नेतृत्वाखालील कॉंग्रेस सरकारने केली होती.

या निर्णयामुळे तळागाळातील महिलांच्या राजकीय सहभागाला मोठी चालना मिळाली, असं प्रियंका गांधी म्हणाल्या. महिलांच्या आरक्षणाच्या अंमलबजावणीला भविष्यातील मतदारसंघ पुनर्रचना प्रक्रियेशी जोडण्याच्या केंद्र सरकारच्या निर्णयावर त्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केलं. त्या म्हणाल्या....

**कांग्रेस सरकार ने इस कानून को सदन में पारित करके लागू किया। आज अपने भाषण में प्रधानमंत्री जी ने जो पंचायत की आंदोलित महिला का जिक्र किया तो यह समझ लीजिए कि इस कदम के चलते ही आज चालीस लाख पंचायत प्रतिनिधियों में से पंद्रह लाख महिलाएं हमारे लोकतंत्र में भागीदार हैं।**

राज्यसभेत काल विनोद तावडे, नितीन नबीन, अभिषेक मनुसिंघवी, यांच्यासह काही या नवनिर्वाचित सदस्यांनी शपथ घेतली. विनोद तावडे यांनी मराठीत शपथ घेतली.

**राज्यसभा उपाध्यक्ष**

राज्यसभेच्या उपाध्यक्षपदासाठी आज सभागृहात निवडणूक होणार आहे. केंद्रीय मंत्री जे .पी. नड्डा या पदासाठी नामनिर्देशित सदस्य हरिवंश यांच्या निवडीचा ठराव मांडतील. भाजपचे खासदार एस फँगनॉन कोन्याक या ठरावाला अनुमोदन देतील. याशिवाय निर्मला सीतारामन आणि जयंत चौधरी हे केंद्रीय मंत्री तसंच भाजपचे अध्यक्ष आणि खासदार नितीन नबीन आणि जदयूचे खासदार संजयकुमार झा हे देखील राज्यसभा उपाध्यक्षपदासाठी हरिवंश यांच्या नावाचा ठराव मांडतील.

**पंतप्रधान-राष्ट्रपती ऑस्ट्रिया चान्सलर भेट**

ऑस्ट्रियाचे चान्सलर डॉ. क्रिस्तियन स्टॉकर यांनी काल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची नवी दिल्लीत राष्ट्रपती भवनात भेट घेतली. या भेटीमुळे दोन्ही देशांमधल्या द्विपक्षीय संबंधांच्या सर्व महत्त्वाच्या पैलूंना गती मिळेल याबाबत दोघांनीही एकमत व्यक्त केल्याची माहिती राष्ट्रपतींनी या भेटीसंदर्भात समाज माध्यमावर लिहिलेल्या संदेशात दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही काल क्रिस्तियन स्टॉकर यांच्याशी शिष्टमंडळ मंडळ स्तरावर चर्चा केली. यावेळी उभय देशांमधे लष्करी सहकार्य, खाद्यसुरक्षा यासारख्या विविध क्षेत्रातल्या सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या झाल्या.

**पीएम मॅक्रॉ चर्चा**

फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉ यांनी काल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा केली. यावेळी मोदी आणि मॅक्रॉ यांनी पश्चिम आशियातील परिस्थितीवर चर्चा करताना होर्मुझची सामुद्रधुनी पार करण्यासाठी त्या भागात सुरक्षा आणि स्वातंत्र्य तातडीनं पूर्ववत होण्याच्या गरजेवर सहमती व्यक्त केली. तसंच या भागात शांतता आणि स्थिरता प्रस्थापित होण्यासाठी प्रयत्नांमध्ये परस्परांचं सहकार्य सुरू ठेवण्याचाही दोघांनी पुनरुच्चार केला. पंतप्रधानांनी समाजमाध्यमावरील संदेशात ही माहिती दिली आहे.

**इस्रायल लेबेनॉन**

इस्त्रायल आणि लेबेनॉन यांच्यात 10 दिवसांची तात्पुरती युद्धबंदी लागू झाली असून लेबेनॉनची राजधानी बैरुत इथं या युद्धविरामानंतर जल्लोष करण्यात आला. शहरात फटाक्यांची आतषबाजी करून आनंद साजरा करण्यात आला. उभय

देशांदरम्यान राजनैतिक चर्चेसाठी चांगलं वातावरण निर्माण व्हावं यासाठी ही तात्पुरती युद्धबंदी जाहीर करण्यात आली असून काल रात्रीपासून त्याची अंमलबजावणी सुरू झाली.

**ट्रंप ईराण**

इराणनं, आण्विक शस्त्र निर्मितीसाठी वापरण्यात येणारं समृद्ध युरेनियम देण्यास सहमती दर्शवली असल्याचा दावा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी केला आहे. दोन्ही देश शांतता करार करण्याच्या जवळ पोहोचले असून लवकरच हा करार होण्याची शक्यता असल्याचं त्यांनी काल व्हाईट हाऊसमध्ये पत्रकारांशी बोलताना सांगितलं. शांतता करार झाल्यास तेल पुरवठा पूर्ववत होणार असून होर्मुझ सामुद्रधुनी खुली राहील आणि सर्व सुरळीत होईल असं ते म्हणाले. गेल्या आठवड्यात इस्लामाबादमध्ये अमेरिका आणि इराण दरम्यान झालेल्या शांतता वाटाघाटी निष्फळ ठरल्या होत्या. तत्पूर्वी इराणनं आपला युरेनियम समृद्धीकरणाचा कार्यक्रम पाच वर्षांसाठी स्थगित करण्याचा प्रस्ताव ट्रम्प प्रशासनानं फेटाळत तो 20 वर्षांसाठी थांबवण्याचा आग्रह धरला होता

**प.बंगाल याचिका प्रचार**

पश्चिम बंगालमध्ये होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकांच्या पार्श्र्वभूमीवर निवडणूक आयोगानं केलेल्या एक हजारांहून अधिक प्रशासकीय आणि पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्यांना आव्हान देणारी याचिका सर्वोच्च न्यायालयानं काल फेटाळली. राज्य सरकार आणि निवडणूक आयोग यांचा परस्परांवर विश्वास नसणं ही चिंतेची बाब असल्याचंही सर्वोच्च न्यायालयानं याचिका फेटाळताना सूचित केलं आहे.

दरम्यान बंगालमधील निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात, येत्या 23 तारखेला होणाऱ्या मतदानाला जेमतेम सहाच दिवस बाकी असताना राज्यात प्रचाराचं वातावरण चांगलंच तापलं आहे. राज्याचे विरोधी पक्षनेते सुवेंदु अधिकारी यांनी काव पुरुलिया जिल्ह्यात प्रचारसभा घेतल्या. आसामचे मुख्यमंत्री हिमंता विस्वसर्मा यांनी राज्याच्या उत्तर भागात प्रचार दौरा केला. मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनीही आपल्या तृणमूल काँग्रेसच्या प्रचारासाठी उत्तर बंगालमधील काही जिल्ह्यांमध्ये प्रचार तसंच रोड शो केला.

**निवडणूक-मुंबई**

महाराष्ट्र विधान परिषदेच्या 9 जागांसाठी 122 मे रोजी मतदान होणार असल्याचं निवडणूक आयोगाने काल जाहीर केलं. या निवडणुकीसाठी 23 ते 30 एप्रिल या कालावधीत उमेदवारी अर्ज भरता येतील. 2 मे रोजी अर्जांची छाननी होईल, 4 मे पर्यंत अर्ज मागे घेता येतील. आणि 12 मे रोजी सकाळी 9 ते दुपारी 4 या वेळेत मतदान होईल.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं

# नमस्कार